# रंगरेखा रेखिताना

**सुनंदा काकडे**




शिकागोला बृ.म.मं.च्या अधिवेशनात रांगोळी काढाल का असे जूनमध्ये सुजीत वैद्य यांचे ई-पत्र येईपर्यंत अधिवेशनाला जाण्याचा विचारही केला नव्हता. मिनिसोटाच्या मराठी असोसिएशनच्या दिवाळीला दरवर्षीप्रमाणे मी रांगोळी काढली होती. अधिवेशनाचे आमंत्रण देण्यासाठी आलेल्या रामदास थत्ते यांनी ती पाहिली होती व तो फोटो सुजीतना दाखवला होता. मकॉर्मिकसारख्या अतिविशाल, भव्य ठिकाणी आपल्याला कलादर्शनाची संधी मिळणार म्हणून मी उत्साहाने होकार दिला. पुढील महिना

झपाटून पूर्व तयारी केली. उद्घाटनाला दीपप्रज्वलन असते तेथे संस्कारभारतीची जलद होणारी रांगोळी काढण्याचा प्रथम विचार होता. पण मग 'मराठी बाणा' हा सुप्रसिद्ध मुख्य कार्यक्रम आहे तेव्हा त्याला साजेसे, म्हणजे शिवाजी महाराजांचे भव्य चित्र प्रवेशद्वाराच्या कमानीजवळ काढावे असे वाटले. पाठीमागे मिशिगन सरोवराकाठची स्कायलाईन व त्यात BMM बोधचिन्हाचा ध्वज काढावा ही कल्पना सुचली. अशा पोर्ट्रेट पद्धतीच्या चित्राला कित्येक तास काम करावे लागते, रांगोळी, रंग बरेच लागतात हा पूर्वीचा अनुभव होता. रांगोळीचे माध्यम हे भलतेच नाजूक. बोटातून घसरणारी, वाऱ्याने भुरुभुरु उडणारी आणि प्रदर्शन संपल्यावर व्हॅक्यूम क्लीनरमध्ये सहज लुप्त होणारी ही बारीक रेती, शुभ्र व चमकदार. जीवनातील क्षणिकता व चैतन्य यांचे द्योतक हेच त्याचे विशेष सौंदर्य आहे. समुद्राच्या लाटा ओहोटीला जाताना रात्री पुळणीवर अशा रेतीत असंख्य कलाकृती रेखाटून ठेवतात. तर भरतीच्या लाटा त्या पुसून पुन्हा चित्रफलक कोरा करतात नव्या रांगोळीसाठी. रांगोळीला येथे Sand painting असे म्हणतात. त्यासाठी येथे Colored Sand वेगवेगळ्या रंगांची मिळते.

जूनअखेर बृ,म.मं.ने चित्राची कल्पना येण्यासाठी Sketch मागवले. तेव्हा ४ जुलैच्या सुटीत मी पूर्ण रांगोळीच घरी फरशीवर काढून पाठवायचे ठरवले. भारततही हॉटेलमध्ये रांगोळी बोर्ड ठेवून त्यावर काढली तरच परवानगी देतात. तेव्हा ६ फूट x ६ फूट बोर्ड मिळवणे भाग होते. मकॉर्मिकचे नियम फार कडक आहेत, कोणी मदत करणार नाही, भिंतीवर काहीही लावायला परवानगी नाही, fire hazard चीही खबरदारी घ्यावी लागते,... वगैरे बृ.म.मं.ने कळवले. शेवटी २' x २' चे ९ तुकडे जोडून ६' x ६' असा मोठा फलक कार्पेटवर ठेवायचे ठरवले. ४ जुलैच्या रांगोळीचे फोटो बृ.म.मं. कमिटीला पाठवले, त्यांनी ते मंजूर केले. मग त्या रांगोळीचा गावातील स्नेही मंडळींना preview दिला. येथून बरीच मंडळी जाणार होती. बुधवारी २० जुलैला गाडीत सर्व रांगोळीला लागणारे सामान रचून शिकागोत दुपारी दाखल झालो.

रांगोळीला चुकून धका लागू नये म्हणून भिंतीकडे व बाजूला मला जागा दिली होती. मी सांगितल्याप्रमाणे तीन बाजूंना barricade - जाड साखळ्यांचे अडसर लावले होते. रात्री ८ वाजता तेथील दिवे बंद होणार होते म्हणून हिल्टन हॉटेलमधून सामान ठेवण्याची हातगाडी घेऊन त्यावर सर्व बोर्ड, colored sand च्या जडशीळ पिशव्या, सर्व इतर लागणारे सामान तेथे नेऊन ठेवले. गुरुवारी पहाटे लवकर उठून मोठ्या हॉलमध्ये ६ वाजता आले तेव्हा तेथे कोणीच नव्हते. सुंदर पहाट समोर मिशिगन तलावावर उगवत होती. बाहेर खूप गरमी होती. मी रांगोळीला थोड्या अंधारातच सुरुवात केली. सुमारे ७ वाजता Event Manager अॅन्थनी मॅगीओर हा आला व अंधारात काय करतेस असे म्हणून त्याने मोठे दिवे चालू केले. हा पोरगेलासा अॅन्थनी, त्याने पुढील ३ दिवस मागेन ती सर्व मदत केली. नंतर हळूहळू House keeping मधील मंडळी आली. त्यातील मुख्य टोनी नावाचा, खूपच विनोदी. दिवसभर तो रांगोळी कुठवर आली ते पाहून जात होता. सर्वांनाच Sand painting या प्रकाराबद्दल उत्सुकता होती. हे काम सर्व पुसून टाकायचे याचे कुतुहल वाटत होते. दुपारी समोरील भिंतीजवळ गणपती बसवणारे स्वयंसेवक आले. नंतर जेवणाचा हॉल उघडला. विक्रेते आपापले स्टॉल्स ठेवू लागले. मग सरोवराकडील

दरवाजे उघडले व जेवणघरात मांडायच्या टेबल खुर्च्या आणल्या गेल्या. त्यावेळी सर्वत्र बाहेरून आत माशा आल्या. "बाहेर खूप गरमी, त्यामुळे त्या पाण्यावरून आत आल्या हे नवीनच" असे ॲन्थनी म्हणाला. सर्व कर्मचाऱ्यांना व स्वयंसेवकांनाही त्रास होत होता. नंतर त्या चावू लागल्या व रांगोळीवर येऊन बसू लागल्या, त्यामुळे शेवटी काम थांबवून मी हॉटेलच्या खोलीवर गेले. रात्री ८ ला सर्व दरवाजे बंद झाले की येणार नाहीत असे ॲन्थनीला वाटले. त्याने रात्री उशीरापर्यंत दिवे माझ्यासाठी चालू ठेवले.

८ ला मी पुन्हा परत आले तेव्हा बाहेरचे दरवाजे बंद झाले होते, त्यामुळे बाहेरून माशा येत नव्हत्या पण आतील बाहेर जाऊ शकत नव्हत्या. तोपर्यंत रांगोळी जवळजवळ पूर्ण झाली होती. उरलेली रात्री १० पर्यंत, दिवे जायच्या आत संपवली.

शुक्रवारी आम्ही दोघे सकाळी ७ ला येऊन पाहतो तो रात्री एअर कंडिशन सुरू झाल्यावर आत अडकलेल्या माशा सर्वत्र मरून पडलेल्या. रांगोळीवरही पडल्या होत्या त्या अलगद वेचून काढल्या. पुन्हा थोडीफार दुरुस्ती करून, सर्व बाजूचे आवरून शीर्षकाची कविता मोठ्या बोर्डवर लावून रांगोळीखालीच ठेवली व ८ वाजता अधिवेशनाच्या प्रारंभासाठी रांगोळी तयार झाली.

मात्र झाले काय की हॉल इतका मोठा होता की मधील कट्ट्यावर थांबायला येणारे लोकही तेथे ठेवलेल्या मसाज पार्लरच्या पुढे येत नव्हते. भिंतीवर मागे काही मोठी पाटी न लावता आल्यामुळे तिकडे रांगोळी आहे हे कुणाला समजतच नव्हते. प्रवेशद्वारातून लोक डावीकडे जेवणघरात किंवा उजवीकडे एरी क्राऊन थिएटरकडे जात होते. तेव्हा माझ्या ओळखीच्या लोकांव्यतिरिक्त फारसे कुणी लोक रांगोळी पहायला आले नाहीत हे शुक्रवारी आमच्या लक्षात आले. तेव्हा शनिवारी सकाळी मी ॲन्थनीच्या मदतीने रांगोळी पुढे हलवायचे ठरवले. त्याने fire marshall ची परवानगीही मिळवली व मदतीला बरेच लोकही आणले. बोर्डाखाली मी कार्पेट रांगोळीने खराब होऊ नये म्हणून पांढऱ्या चादरी पसरल्या होत्या. त्या चादरी हळू ओढत, वरील बोर्ड व त्यावरील रांगोळी हे सर्व ओढत आणून गणपतीच्या साधारण समोर तो ६ फूट x ६ फूट नऊ तुकड्यांनी जोडलेला रांगोळी धारक बोर्ड आणला. बाजूने जास्तीचे बॅरीकॅड House keeping च्या लोकांनी पटापट आणून लावले. एक छोटा स्टँड दिला होता, त्यावर 'रांगोळी' असे लिहून शेजारी ठेवला. या सर्व खटाटोपाला यश आले आणि दुपारपासून पुष्कळ लोक तेथे आकर्षित झाले. मी रात्री 'मराठी बाणा' सुरू होईपर्यंत रांगोळीजवळच होते. पुष्कळ लोकांच्या ओळखी झाल्या. नवीन पिढीतील मंडळींना खूप कुतुहल होते. लहान मुलेही रांगोळी हाताळून पहात होती. स्वाती व अरविंद दांडेकर मुद्दाम येऊन भेटून गेले. अनेक नवीन मराठी मंडळी भेटणे हे अधिवेशनाचे मुख्य उद्दिष्ट त्या अर्ध्या दिवसात बरेचसे साध्य झाले.

रविवारी सकाळी सुटसुटीत ब्रंच घेऊन मिनिसोटाच्या आमच्या बऱ्याच लोकांचा काफिला परत जायला निघणार होता. तेव्हा रांगोळी पुसायची वेळ १० वाजता ठरवली. ॲन्थनी व त्याचे बरेच कर्मचारी जमले. तीन दिवस त्यांचा खूप परिचय झाला होता. इतके परिश्रम घेऊन काढलेली ही कलाकृती नुसती व्हॅक्यूम करायची म्हणून त्यांना हळहळ वाटत होती. माझे अशा वेळी नेहमी एक उदाहरण असते, ते म्हणजे लग्नात खूप परिश्रमाने बनविलेला, सजविलेला भला मोठा केक पाहून झाल्यावर आपण कापून

टाकतो आणि पुन्हा नवीन बनवतो, तसेच हे आहे.

पुन्हा पुन्हा बनवण्याचा आनंद मिळवतो. स्वानंद खरा तर तोच असतो. पण मकॉर्मिकमध्ये अधिक एक आनंद उपभोगला. तो म्हणजे, ॲन्थनी म्हणाला की "माझ्या ऑफीसमधील स्टाफला गेले ३ दिवस Sand painting बद्दल सांगितले आहे, तर डावीकडून मधला २ x २ चा चौकोनी बोर्ड, ज्यावर शिकागोची स्कायलाईन व BMM चे निशाण आहे, तो मी ठेवून घेऊ का सर्वांना दाखवण्यासाठी?" त्याने अलगद तो तुकडा हातगाडीवर ठेवला आणि कलाकाराला रसिकाने दाद दिल्यावर होणारा सुंदर अनुभव मला अगदी खोलवर जाऊन भिडला.

*****